नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/०८/२०२५ ( मंगळवार )**

---

## ४८ तासात चोरीचा गुन्हा उघड, संपुर्ण मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :—दिनांक ०९/०८/२०२५ रोजी पोलीस स्टेशन येथे फिर्यादी सुरेखा विकास मोहोड, वय ५२ वर्षे, खरबी चौक ,नागपुर यांनी तक्रार दिली की त्या अनुसया माता मंदीर, पारडसिंगा येथे दर्शनासाठी गेल्या असता त्यांच्या गळयातील सोन्याचा गोफ कोणीतरी अज्ञात आरोपीने गर्दीचा फायदा घेवुन चोरी करून नेला आहे. यावरून पोलीस स्टेशन काटोल येथे कलम ३०३(२) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयाचा तपास काटोल पोलीस करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांनी सुध्दा तात्काळ सदर गुन्हयाचा तपास सुरू केला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक पध्दतीने तपास करून दिनांक ११/०८/२०२५ सदर गुन्हयातील महीला आरोपीला निष्पन्न केले. **महीला आरोपीस ताब्यात घेवुन तिला विचारपुस केली असता तिने गोफ चोरी केल्याचे कबुल केले.** आरोपीचे ताब्यातुन चोरीस गेलेला सोन्याचा गोफ १९.५० ग्रॅम किंमती १,८८,०००/—रुपये असा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. अवघ्या ४८ तासाच्या आत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर गुन्हयाची उकल करून गुन्हयातील चोरीस गेलेला संपुर्ण मुद्देमाल जप्त केला आहे.

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद आरोपी अटक, देवलापार पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवलापार** :— दिनांक १०/०८/२०२५ रोजी देवलापार पोलीसांना गुप्त बातमीदारद्वारे माहिति मिळाली की, प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक केली जाणार आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी जुने देवलापार पोलीस स्टेशन समोर जबलपुर शिवणी ते नागपुर हायवे रोडवर नाकाबंदी केली असता होंडा शाईन मोटरसायकल क्र एम.एच—४० ए डब्ल्यु ६६२१ येतांना दिसली. सदर वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता वाहनावर एका चुंगडीमध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुगधीत तंबाखु मिळुन आला. मोटर सायकल चालक आरोपी **नामे विकास राजेंन्द्रकुमार जैस्वाल, वय ३३ वर्ष, रा. वार्ड क्र. ५, पवनी, ता. रामटेक याचे ताब्यातुन** १) आर.के. ब्रॅन्ड, २) हुक्का शिशा तंबाखु होला ब्रॅन्ड ३) हुक्का शिशा सुगंधित तंबाखु इगल ब्रॅन्ड, ४) पानमसाला राजश्री ब्रॅन्ड , ५) सुगंधित तंबाखु डबल ब्लॅक १८ ब्रॅन्ड , ६) सुगंधित तंबाखु ब्लॅक लेबल १८ ब्रॅन्ड असा एकुण १८.४५२ किलोग्रॅम किंमती २१,३१७/— रूपयांचा प्रतिबंधीत अन्नपदार्थ आणि मोटर सायकल क्रमांक एम. एच. ४० ए. डब्ल्यु. ६६२१ किंमती ४०,०००/— रूपये असा एकुण ६१,३१७ /— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपी विरूद्ध पोस्टे देवलापार येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**नमुद आरोपीला पोलीसांनी अटक केली आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक ११/०८/२०२५ रोजी काटोल पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की मौजा पेठबुधवार काटोल येथे काही इसम ५२

ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे.मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी जावुन धाड टाकली असता आरोपी नामे १) उज्वल मधुकरराव कावडे, वय ३४ वर्ष, २) पंकज एकनाथ बागडे, वय ३५ वर्षे ३) मंगेश बाबारावजी जोगे, वय ४० वर्षे ४) संकेत विकासराव मेहर वय २६ वर्षे ५)बंटी लक्ष्मणराव गाढवे, वय ३४ वर्षे ६) निखील मनोहरराव महाजन, वय ३४ वर्षे ७) वहीद मजीद शहा, वय २५ वर्षे, सर्व रा. पेठबुधवार काटोल, ता. काटोल जि. नागपुर ८) जिशान शकील शेख, वय २५ वर्षे, रा.फल्ली मार्केट, काटोल, ता.काटोल हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपीतांच्या **ताब्यातुन ५२ तास पत्ते व रोख रक्कम ११,७५०/— रूपये** जप्त करण्यात आले आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन काटोल येथे १२ (अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना देशीदारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन कन्हान :—** दिनांक ११/०८/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा सिहोरा रोडवर नाकाबंदी केली असता पांढ—या रंगाची इलेक्ट्रीक ओला मोपेड क्रमांक एम.एच ४० सि. व्हि. ३०१२ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता वाहनाचे समोर एका कापडाचे थैलीत देशीदारू मिळुन आली. आरोपी नामे धमेंद्र अरविंद श्रोते, वय ३० वर्षे, रा. यादवपुरा कन्हान हा अवैधरीत्या दारूची वाहतुक करतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष १) भिंगरी संत्रा नं १ देशी दारू किंमती ५०४०/— रूपये ४) इलेक्ट्रीक ओला मोपेड क्रमांक एम.एच ४० सि. व्हि. ३०१२ किंमती ८०,०००/— रूपये असा एकुण किंमती ८५,०४०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६८३ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १२/०८/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६८३ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :– नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३३ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :– उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २६ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २८ आरोपी अशा एकुण ११४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :–** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण ११८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :– कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापरखेडा येथे ३३ आरोपी अशा एकुण ९१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :–** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २८ आरोपी अशा एकुण ११९ उरेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :–** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५५ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३२ आरोपी आणि

पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २८ आरोपी अशा एकुण १४५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २२ पोलीस स्टेशन एकुण ६८३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**









# रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ११/०८/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक १२/०८/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन भिवापुर अंतर्गत भिवापुर टाउन येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्रीमती वृष्टी जैन यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. उमरेड पोलीस स्टेशन अंतर्गत बायपास चौक उमरेड येथे नाकाबंदी करण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन सह दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने